# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- कु. गौतमी सरदेसाई

---

नादयुक्त असे गायन, नृत्य आणि वादन,
या तिहेरी संगमाच्या संगीताने प्रफुल्लित मन.
या संगमाचे संगीत ऐसे नाव,
बहुविध संगीत घेई मनाचा ठाव.
गायन व वादन म्हणजे नव्हे संगीत फक्त,
सूर, ताल व लय यांचे संगीत मस्त.
संगीत असे साहित्यातील साधन,
मानसिक स्वास्थाचे देई धन.
सं म्हणजे स्वर,
गाणी बनवी सुस्वर.
संगीताचे जे कंपित सप्तस्वर,
क्रमबद्ध कंपन म्हणजे सूर.
गी म्हणजे गीत,
करि श्रोत्यांचे हित.
त म्हणजे ताल,
गीतांना मिळे चाल.
सुरांना संगीतबद्ध करतो काल,
याला संगीतकार म्हणती ताल.
ताल ही हिंदुस्तानी संगीताची विशिष्ट संकल्पना,
इतर संगीत पद्धतीहून सुंदर याची रचना.
या सर्व रचनेचा केंद्रबिंदू आहे सम,
तिचे आकलन ही संगीतस्वादाची पायरी प्रथम.
तालाची मात्रा वा बिंदू जो असे प्रथम,
त्यास हिंदुस्तानी संगीत क्षेत्रात म्हणती सम.
श्रोत्यांनी एकत्रित केलेली समान वाहवा,
या समेचा परमानंद भरून घ्यावा.
काव्यातील शब्दांची सुलभता,
निर्माण करते गेयता.
काव्याची सुश्राव्य गेयता,
श्रोत्यांप्रति निर्मितें समरसता.

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

चीज गायन-वादनात आलाप घडवी आविष्कार,
रागांचे दिग्दर्शन करिं क्रमबद्ध सविस्तर.
तान हा संगीताचा अभिजात अलंकार,
तयार गळ्याचा आहे हा अभ्यासकार.
तान करिं स्वरांची नक्षी साकार,
रसिकां करें लयीच्या झुल्यावर स्वार.
तयांचे हरपून जाई भान,
सांगीतिक अनुभव करें प्रदान.
मींड सुरांमधील सुरेल आस,
गायन-वादनात करते आरास.
18 कलांमधील कला श्रेष्ठ,
संगीतातून होती भावना व्यक्त.
आनंदात समजती संगीतातील शब्द,
दुःखात कळे तयांचा अर्थ.
ईश्वराची ही देणगी अमूल्य,
भावना मांडणे झाले शक्य.
संगीत आहे प्रेरणा नीरस आयुष्याची,
एकांतात देते संधी स्व परिक्षणाची.
प्रत्येक रागाला असतो स्वतंत्र स्वभाव,
विशिष्ट स्वररचनेतून व्यक्त होती भाव.
हलके जेथे होते मन,
तेथे मंत्रमुग्ध श्रोते जन.
जगी घडले अनेक प्रतिभावंत संगीतकार,
सध्या मात्र आधुनिक कवींचाच भार.
संगीत क्षेत्रात अनेक गायकी घराणी,
स्वतःची अशी त्यांना अनोखी वाणी.

Anahat Music Therapy